## हृदय विकसित करण्याची साधना

आत्मसाक्षात्कार करून घ्यावयाचा असल्यास आपले मन शुद्ध हवे, मन मोकळे केल्याखेरीज, सर्व तऱ्हेच्या वासना, हांव, चिंता, भ्रम, गर्व, विषयवासना, आसक्ती आवड-नावड या गोष्टीतून ते मुक्त झाल्याखेरीज ते सर्व श्रेष्ठ अशा असीम शांतीच्या प्रदेशात प्रवेश करू शकणार नाही. मनाची तुलना उद्यानाशी करतात. ज्याप्रमाणे बागेत फुलझाडे आणि फळझाडे यांची पैदास, सर्व तऱ्हेची मेहनत घेऊन म्हणजे जमिनीची नांगरण करून, तिथं खत टाकून, काटे कुटे, मुळांची जाळी तण वगैरे काढून, जमिनीची कोळपणी करून झाडांना आणि रोपांना पाणी देऊन त्यांची जोपासना केली जाते त्याचप्रमाणे तुम्ही मनाची मशागत करून, त्या मनाच्या बागेत भक्तीची फुलं वाढविली/फुलवली पाहिजेत, काम, क्रोध, लोभ, अहंकार इत्यादी अशुद्धता दूर करून मनाच्या बागेतील ही भक्तीची फुलं दैवी विचारांचे पाणी देऊन जोपावयास हवीत.

पावसाळ्यात गवत, काटे उगवून येतात आणि उन्हाळ्यात नाहीसे होतात. पण त्यांचे बी जमिनीत तसेच राहते. आणि पर्जन्यवृष्टी झाली की पुन्हा ती अंकुरतात. त्याचप्रमाणे मनाच्या वृत्ती प्रकट होऊन पुन्हा मावळल्या तरी त्यांचा संस्कार मागे राहतोच. तेच पुन्हा वृत्तींना कारणीभूत होतात, ते बाह्य किंवा आंतरिक मिळाल्यावर होय.



तुम्हाला बाग स्वच्छ ठेवावयाची असल्यास नुसती तणं/मुळं काढून उपयोगी नाहीत. त्यांचे बी सुद्धा नष्ट करावयास हवे. एरवी ते पुन्हा उगवून येईल. त्याचप्रमाणे तुम्हाला मनातील नुसत्या मोठ्या उसळत्या लहरी नाहीशा करून उपयोगी नाही तर जन्ममरणाला कारणीभूत होणारे बीजरूप संस्कारही नष्ट करावयास हवेत. तरच तुम्ही उच्चतम जाणीवेची पायरी गाठू शकाल.

ज्यांनी जप, सेवा, दान, प्राणायाम इत्यादिनी मनातील अशुद्धता दूर केली आहे. त्यांना ध्यानाला बसल्याबरोबर ध्यान साधेल. शुद्ध आणि पूर्णपूत मन ध्यानाच्या अग्नीने तत्काळ भस्मसात् होते. ध्यानाशिवाय आत्मज्ञान प्राप्ती शक्य नाही. दैवी अवस्थेची/गुणसंपदेची वृद्धी ध्यानाच्या साहाय्याशिवाय शक्य नाही. ध्यानाशिवाय मनाच्या भ्रमन्तीपासून सुटका नाही. आणि अमरत्वाची प्राप्ती नाही. नियमित ध्यानाने आत्म्यावरील आवरण दूर करा.

आत्मप्राप्ती हे जीवनाचे ध्येय आहे. नीतिपूर्ण जीवन आणि सततचे ध्यान या साधनाने हे ध्येय प्राप्त करता येते. व्यावहारीक कर्तव्यापेक्षा आध्यात्मिक कर्तव्य अनेक पटीने महत्त्वाचे आहे. आपले जगणे देवाच्या शोधासाठी असावे. ते मानवतेच्या सेवेसाठी असावे. भगवंताची ही इच्छा पूर्ण करा. तुम्ही सुखी व्हाल, धन्य व्हाल.



## प.पू. स्वामी शिवानंद सरस्वती - चरित्र, तत्वज्ञान आणि कार्य

दरवर्षी १४ जुलैला आपल्या शाखेच्या वतीने स्वामी शिवानंद सरस्वती स्मृती व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते. यावर्षीचे पुष्प सौ. राजलक्ष्मी देशपांडे यांनी गुंफले. स्थळ होते डी.एस.के. विश्व येथील ज्येष्ठ नागरिक संघाचे सावरकर सभागृह. सुमारे दीड तास चाललेल्या या व्याख्यानाला श्रोत्यांची उपस्थिती आणि मिळालेली दाद लक्षणीय होती. व्याख्यानातील काही विचार-

* स्वामीजींचा योगसमन्वय हा कर्मयोगाचा, भक्तीयोगाचा आणि ज्ञानयोगाचा समतोल होता.
* सेवा-प्रेम-दान-ध्यान-चित्तशुद्धी-आत्मसाक्षात्कार या पायांवर आधारीत त्यांनी 'दिव्य जीवन संघ' या संस्थेची स्थापना केली.
* स्वामीजींनी शरीर, मन, बुद्धी, आत्मा यांचा सर्वांगीण विचार केलेला आढळतो.
* शरीरासाठी-योगासने, मनासाठी-निग्रह, बुद्धीसाठी-स्वाध्याय आणि आत्म्यासाठी स्वामीजींनी ध्यान, जप हे मार्ग सांगितले.
* स्वामीजींच्या तेजस्वी शिष्यांची परंपरा -
  सत्यानंदजी (हठयोग)
  चिन्मयानंदजी (ज्ञानयोग)
  कृष्णानंदजी (ज्ञानयोग)
  शांतानंदजी (अन्नलक्ष्मी)
  शिवानंद हृदयानंदजी (कर्मयोग)

## बारावी राज्यस्तरीय आंतरशालेय निबंध स्पर्धा

यंदा ९ शाळांमधील २३७ विद्यार्थ्यांनी निबंध स्पर्धेत भाग घेतला. स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे–

१) प्रथम क्रमांक– श्रावणी कृष्णात पाटोळे
(कै.ग.रा.पुरोहित कन्या प्रशाला, सांगली)

२) द्वितीय क्रमांक – अक्षता रणजित नाचरे
(अहिल्यादेवी हायस्कूल फॉर गर्ल्स, पुणे)

३) तृतीय क्रमांक – प्रज्योत दत्तात्रय पाटील
(सिटी हायस्कूल, सांगली)

४) उत्तेजनार्थ – अ) स्नेहल पांडुरंग डिंबळे
(अहिल्यादेवी हायस्कूल फॉर गर्ल्स, पुणे)
ब) किर्ती देविदास आदमाने
(मुलींचे आगरकर हायस्कूल, पुणे)

सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे/शाळांचे आभार आणि विजेत्यांचे अभिनंदन.

तेरावी राज्यस्तरीय आंतर–महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा दि. २४ सप्टेंबर रोजी भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे येथे सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आलेली आहे.



## दिव्य जीवन संघ, पुणे शाखा वृत्तांत

* ऑगस्ट महिन्याचा सत्संग १३ तारखेला डॉ. राव यांच्या घरी संपन्न झाला.
* ''दिव्य जीवन'' या मासिक पत्रिकेचा अंक परिवारातील सदस्यांना वितरीत करण्यात आला.
* 'Philosophy of life' या पुस्तकाचा मराठीत अनुवाद ''शोध .... जीवनाचा'' या नावाने आपल्या शाखेचे अध्यक्ष श्री. भ.रा. नाईक यांनी केला व सदर पुस्तकाचे प्रकाशन सांगली येथे करण्यात आले.

### पुणे शाखेचा पत्ता

श्री. गो. आ. नगरकर
'स्वानंद एस् २०,
सहजीवन सोसायटी,
पर्वती, पुणे ४११००९
मो. ९३७०५७०२०६

श्री.नितीन देशपांडे
'ईशावास्य'
प्लॉट नं. ४९/सायंतारा,
डी.एस.के. विश्व, धायरी,
पुणे ४११०४१
मो.नं. ९८५०९३१४१७
९८५०८२६९९०

बुक पोस्ट

प्रति





# दिव्य जीवन



वर्ष १२/अंक ८
ऑगस्ट २०१७
दिव्य जीवन संघ, पुणे शाखा

दिव्य जीवन संघ, संस्थेच्या ऋषीकेश मुख्यालयात दि. १४ व १५ ऑगस्ट रोजी शाखा सदस्यांची एक बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या संदर्भातील सूचना संस्थेतर्फे पत्राद्वारे आपल्या शाखेस मे महिन्यात मिळालेली होती. त्यानुसार आपल्या शाखेच्या वतीने श्री. आशिष नाईक हे सदर बैठकीस प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते.

१४ जुलैचे ''शिवानंद स्मृती व्याख्यान'' त्यानंतरची बारावी राज्यस्तरीय आंतर–शालेय निबंध स्पर्धा आणि आता २४ सप्टेंबर रोजी तेरावी राज्यस्तरीय आंतर–महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा या आपल्या शाखेच्या सलग उपक्रमांबद्दल या अंकात माहिती आहे.